लोकमत

## मेट्रो-३ : आता केवळ ९ टप्प्यांचे काम राहिले शिल्लक

# ५४.५ पैकी ४८ किलोमीटर भुयार खणले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-बांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो-३चे काम वेगाने सुरू असून, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या दाव्यानुसार, एकूण ५४.५ किलोमीटरपैकी ४८ किलोमीटर भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे.

मेट्रो-३ मार्गाचे भुयारीकरण पूर्ण करण्यासाठी भुयारीकरणाचे केवळ ९ टप्पे गाठणे बाकी आहेत. उर्वरित भुयारीकरण पॅकेज १, ३, ४ व ६ याअंतर्गत पूर्ण होणार आहे. तर आतापर्यंत ३२ टप्पे पूर्ण झाले आहेत. हे पॅकेज २,५,७ अंतर्गत आहेत.

सोमवारी १.१० किलोमीटरचा भुयारीकरणाचा ३२वा टप्पा पूर्ण करण्यात आला. हे भुयारीकरण सिद्धिविनायक उत्तर शाफ्ट ते दादर मेट्रो स्थानक इतके आहे. तर आतापर्यंत एकूण ९४ टक्के भुयारीकरण आणि ९५ टक्के खोदकाम पूर्ण झाले आहे. पूर्ण प्रकल्पाचा विचार करता ८७ टक्के भुयारीकरण आणि ६० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे.



मेट्रो-३ मार्ग मुंबईतील अत्यंत दाटीवाटीची वस्ती, जुन्या इमारती, ऐतिहासिक वारसा तसेच उत्तुंग इमारती, उड्डाणपूल, मेट्रो मार्ग व रेल्वेमार्गाखालून जात आहे. येथे भुयारीकरण करणे आव्हानात्मक आहे. या प्रकल्पासाठी एकूण १७ टनेल बोरिंग मशीन एकाच वेळेला कार्यरत आहेत.

- सुबोध गुप्ता,
संचालक/प्रकल्प,
मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन

### टप्पा आणि स्थानक

- ३३ चर्चगेट ते हुतात्मा चौक
- ३४ सिद्धिविनायक ते दादर
- ३५ सहार रोड ते सीएसएमआयए आंतरदेशीय
- ३६ हुतात्मा चौक ते सीएसएमटी
- ३७ चर्चगेट ते सीएसएमटी
- ३८ सायन्स म्युझियम ते महालक्ष्मी
- ३९ सायन्स म्युझियम ते महालक्ष्मी
- ४० महालक्ष्मी ते मुंबई सेंट्रल
- ४१ महालक्ष्मी ते मुंबई सेंट्रल




युद्धपातळीवर मेट्रोचे काम सुरु आहे.